## ५१. कर्करोगाची जागा, लक्षणे व चिन्हे :

(कर्करोगाचे आव्हान)

| कर्करोगाची जागा व अवयव | विशेष बाबी, लक्षणे, चिन्हे |
|---|---|
| १. तोंडातील कर्करोग : | न भरून येणारा चट्टा, व्रण, गाठ, जबड्याखाली व नंतर मानेत टणक अवधाण. |
| २. घसा : | गिळायला त्रास, घशात गाठ, व्रण, गळ्यातील मानेवर टणक अवधाण. |
| ३. स्वरयंत्र : | आवाजात बदल, आवाज बसणे, स्वरयंत्राची आरशाने तपासणी करावी लागते. मानेत अवधाण |
| ४. श्वसनसंस्था : | सतत खोकला, कधीकधी खोकल्यातून रक्त पडते, क्ष–किरण चित्रात डाग दिसून येतो. |
| ५. अन्ननलिका : | गिळायला त्रास, अन्न छातीत अडकल्यासारखे वाटणे. |
| ६. जठर : | भूक मंदावणे, जठरात अन्न जास्त वेळ राहिल्याने जडपणा, अर्धवट पचलेले किंवा न पचलेले अन्न उलटणे, पोटात हाताला गाठ लागणे, उलटीत कधीकधी रक्त |
| ७. मोठे आतडे व गुदाशय | शौचातून कधी रक्तस्त्राव, शौचविसर्जनाच्या सवयीत बदल, बद्धकोष्ठ. |
| ८. स्तन : | स्तनात टणक गाठ, न भरून येणारा व्रण, काखेत टणक अवधाण. |
| ९. गर्भाशय : | अचानक रक्तस्त्राव, योनिमार्गाच्या तपासणीत गर्भाशयाच्या तोंडावर गाठ, खरखरीतपणा दिसणे, कधीकधी ओटीपोटात गोळा लागणे. |
| १०. रक्त : | रक्तस्त्रावाची प्रवृत्ती, यकृत, पांथरी सुजणे, सतत जंतुदोषाचे आजार (विशेषकरून लहान वयात येणारा कर्करोग.) |
| ११. स्त्रीबीजांडे : | ओटीपोटात किंवा त्यावर गोळा तयार होणे. |
| १२. पुरुषबीजांडे : | अंडवृषण मोठे होणे, कठीण लागणारी सूज. |
| १३. शिश्न : | शिश्नावरच्या त्वचेला किंवा टोकाला खरबरीत गाठ येणे, मधूनमधून रक्तस्त्राव. |
| १४. मूत्राशय : | अधूनमधून लघवीवाटे रक्तस्त्राव, खास नलिका घालून तपासणीत निश्चित निदान. |
| १५. प्रोस्टेट ग्रंथी | लघवीत अडथळा, थेंबथेंब पूमिश्रित लघवी इत्यादी, गुदद्वारातून बोट घालून तपासल्यावर कडक, टणक गाठ लागते. |
| १६. यकृत : | कधीकधी यकृताचा आकार वाढतो. कधीकधी कावीळ व पांढरी विष्ठा. |
| १७. हाडे : | हाडावर टणक सूज. वेगाने वाढणारी, न दुखणारी, विशेषतः मांडीच्या हाडाच्या खालच्या टोकाशी आढळणारी वाढ. |
| १८. रसग्रंथी : | ठिकठिकाणी सुटेसुटे रबरी गोळ्यासारखे अवधाण विशेषतः गळपट्टी, मानेतील अवधाण, ताप व वजन कमी होणे (विशेषकरून लहान वयात येणारा कर्करोग.) |